**कार्यकारी सारांश**

**अवलोकन**

मे. माइंडस्पेस बिझनेस पार्क प्रायव्हेट लिमिटेड (ह्यानंतर "एमबीपीपीएल" किंवा "अर्जदार" असा संदर्भ) [ह्यापूर्वी सेरेने प्रॉपर्टिज प्रायव्हेट लिमिटेड ह्या नावाने ज्ञात] असलेली आणि कंपनी कायदा, १९५६ च्या तरतुदींच्या अंतर्गत अंतर्भूत असलेली कंपनी ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय प्लॉट क्र. सी-३०, ब्लॉक `जी`, एसआयडीबीएल समोर, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१, महाराष्ट्र, भारत येथे आहे.

एमबीपीपीएल, विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) कायदा, २००५ (२८/२००५)च्या कलम ३ च्या अंतर्गत माहिती तंत्रज्ञान/ माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा (आयटी ॲण्ड आयटीईएस) विशेष सुरवात प्लॉट क्र. ३, कळवा, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, तालुका ठाणे, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र येथे सुरु केली आहे.

उपरोक्तच्या संदर्भात एमबीपीपीएल हे प्लॉट क्र. ३, कळवा, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, तालुका ठाणे, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र येथील सेझ परिसरासाठी विद्युत वितरण परवानाधारक आहेत. मान. आयोगाने २०११ च्या खटला क्र. १५७ मध्ये त्यांच्या ११ एप्रिल २०१२ रोजी देण्यात आलेली आदेशाच्या अन्वये एमबीपीपीएलच्या मानलेल्या वितरण परवानाधारक स्थितीच्या नोंदीवर घेतले आहे आणि २१ ऑगस्ट २०१३ रोजी एमबीपीपीएलसाठीच्या परवान्याच्या संदर्भातल्या शर्ती अधिसूचित केल्या आहेत.

ह्याशिवाय, माननीय समितीद्वारे सेरेने प्रॉपर्टिज प्रायव्हेट लिमिटेड ह्यांच्या नावे परवाना वितरणाच्या संदर्भात विशेष अटी जारी करण्यात आल्या होत्या, परंतु, नोव्हेंबर २३, २०१५ रोजी सेरेने प्रॉपर्टिज प्रायव्हेट लिमिटेड चे नामांतरण असे करण्यात ज्यास माननीय आयोगाने मंजुरी दिली आहे आणि त्यानुसार विशेष अटीमध्ये बदल करण्यात आले आहेत.

## १.१ **एमबीपीपीएल द्वारे दाखल करण्यात आलेली मल्टी इयर टॅरीफ (एमवायटी) याचिका**

एमबीपीपीएलच्या विद्युत वितरण कामाची सुरवात एप्रिल ९, २०१५ पासून झाली आहे म्हणजेच आर्थिक वर्ष २०१५-१६, एमईआरसी एमव्हायटी नियमावली(रेग्युलेशन्स), २०११, एमईआरसी एमवायटी नियमावली(रेग्युलेशन्स), २०१५ च्या नियमावली (रेग्युलेशन्स) ५.१(ए)(ii) मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुसार आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी प्रोव्हिजनल ट्रू अप करीता याचिका एमबीपीपीएल ने दाखल केली आहे. ह्याशिवाय, एमबीपीपीएलने एमईआरसी एमवायटी नियमावली (रेग्युलेशन्स), २०१५ च्या नियमावली (रेग्युलेशन्स) ५.१(ए)(ii) अनुषंगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ पासून

२०१९-२० ह्या तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी एमवायटी याचिका दाखल केली आहे. माननीय आयोगाने याचिका क्र. १०/२०१६ मध्ये एमवायटी आदेश ऑक्टोबर २६, २०१६ रोजी जारी केले आहेत.

**१.२ एमवायटी आदेशावर एमबीपीपीएल द्वारे दाखल करण्यात आलेली पुनरावलोकन याचिका**

एमबीपीपीएल ने याचिका क्र. १०/२०१६ मधील एमवाटी आदेश दिनांकित २६ ऑक्टोबर २०१६ चे समीक्षण करण्यासाठी एमईआरसी (कोड ऑफ कंडक्ट) नियमावली (रेग्युलेशन्स), २००४ च्या नियमावली (रेग्युलेशन्स) ८५ च्या अंतर्गत ९ डिसेंबर, २०१६ रोजी याचिका दाखल करण्यात आली आहे.

**१.३ एमईआरसी एमवायटी नियमावली (रेग्युलेशन्स), २०१५ च्या अंतर्गत दाखल करण्यात आलेली मिड टर्म रिव्यू (एमटीआर)**

एमबीपीपीएल ने मध्यावधी आढावा(एमटीआर) याचिका नोव्हेंबर ३०, २०१७ पर्यंत दाखल करणे आवश्यक आहे. दिनांकित २८ नोव्हेंबर २०१७ च्या पत्र क्रमांक : पत्राचा संदर्भ:एमबीपीपीएल/पॉवर/२०१७-१८/एम५५५ एमबीपीपीएल ने माननीय आयोगाकडे विद्युत वितरणाच्या व्यवसायाचा विभागिय हिशोब योग्य वेळेमध्ये मिळाला नसल्याने आणि नुकताच जारी करण्यात आलेला समीक्षण आहवाल उशिरा प्राप्त झाल्याने एमवायटी याचिका दाखल करण्यासाठी १० दिवसांनी मुदत वाढविण्याची विनंती केली होती.

मध्यावधी (एमटीआर) याचिका दाखल करण्यासाठी इतर वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्या (जनरेटिंग कंपनीज) आणि विद्युत वितरण परवानाधारक ह्यानी देखील मुदत वाढीच्या संदर्भात त्याच स्वरूपाची विनंती केली असल्याने माननीय आयोगाने त्यांचा आदेश दिनांकित ३० नोव्हेंबर २०१७ अनुसार करण्यात आलेल्या विनंतीचा विचार करून सदर उपयुक्तता आणि एमईआरसी एमवायटी नियमावली (रेग्ल्युलेशन्स), २०१५ च्या नियामवली (रेग्युलेशन्स) क्रमांक १०२ च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा (पॉवर) वापर करून एमटीआर याचिका दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक २१ डिसेंबर २०१७ पर्यंत वाढविण्यात आली होती.

त्यानुसार, एमबीपीपीएलने ह्याद्वारे विनंती सह मध्यावधी आढावा (एमटीआर) याचिका दाखल केली आहे:

ए) एमईआरसी एमवायटी नियमावली (रेग्युलेशन्स) २००१ च्या तरतुदींच्या (प्रोव्हिजन) अनुषंगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता अचूक समायोजन.

बी) वेळोवेळी फेरफार करण्यात आल्यानुसार एमईआरसी एमवायटी नियमावली, २०१५ च्या तरतुदींच्या मान्यतेनुसार आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता तात्पुरते आर्थिक समायोजन, आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता

अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता बदल करण्यात आलेले एआरआर आणि टॅरीफ.

**आर्थिक वर्ष २०१५ - १६ करीता अचूक समायोजन**

विद्युत वितरण परवानाधारक (डिस्ट्रीब्यूशन लायसन्सी) म्हणून एमबीपीपीएल चे प्रचालन (ऑपरेशन्स) एप्रिल ९, २०१५ म्हणजेच आर्थिक वर्ष २०१५-१६ सुरु झाले असल्याने, एमबीपीपीएल हे आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता एमईआरसी एमवायटी नियमावली, २०११ च्या मान्यतेनुसार, नियमावली ५.१(ए)(ii)मध्ये नमूद केल्याच्या नुसार अचूक समायोजानासाठी साठी याचिका (पिटीशन) दाखल करत आहेत.

याचिका (केस) क्र. १०/२०१६ मध्ये माननीय आयोगाने एमवायटी आदेशांमध्ये त्यांनी तात्पुरत्या अचूक समायोजनेमध्ये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने एमवायटी नियमावली (रेग्युलेशन्स) २०११ अंतर्गत आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता अचूक समायोजन  मागितले आहे. आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता अचूक समायोजन हे एमबीपीपीएल च्या वितरणाच्या परवानाधारकाच्या व्यवसायाच्या लेखा परीक्षित विभागिय हिशोबावर आधारित आहे जे सदर याचिकेच्या संदर्भात जोडण्यात आले आहे.

**२.१ ऊर्जा विक्री:**

अचूक समायोजनाच्या कारणासाठी, एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता वास्तविक विक्री (सेल्स) विचारात घेतली आहे. आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये एमबीपीपीएलद्वारे वास्तविक ऊर्जेची विक्री ८१.८७ एमयू इतकी आहे जे एमबीपीपीएल द्वारे आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता माननीय आयोगाने मान्य केली आहे त्या विक्री इतकीच आहे. जे एमबीपीपीएल ने आर्थिक वश २०१५-१६ मध्ये नमूद केलेल्या अचूक समायोजन मध्ये श्रेणी निहाय दिलेल्या विक्री इतकीच आहे.

**२.२ वितरण तोटा**

एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष २०१५-१६ ह्या कालावधीकरीता झालेल्या वास्तविक झालेली ऊर्जेची विक्री (ॲक्च्यूअल एनर्जी सेल्स) आणि प्राप्त झालेली ऊर्जा विचारात घेतली आहे. एमवायटी आदेशामधील याचिका क्र. १०/२०१६ मध्ये माननीय आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता ०.०८% परिवर्तनीय तोटा वगळल्यानंतर आलेल्या अस्थायी वितरणाचा तोटा ०.६४% असा मान्य केला आहे.

### २.३ ऊर्जा  शेष (एनर्जी बॅलन्स)

एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता वास्तविक ऊर्जा विक्री आणि ऊर्जा खरेदी विचारात घेतली आहे आणि वर नमूद केल्याप्रमाणे अंदाजित ऊर्जा विक्री केली आहे. याचिका क्र. १०/२०१६ मध्ये दिलेल्या आदेशामध्ये माननीय आयोगाने अस्थायी ऊर्जा खरेदी आणि  ऊर्जा विक्री आणि ३.९२% चा आयएनएसटीएस तोटा आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या ऊर्जा शेषकरीता मान्य केले आहे. आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वास्तविक ऊर्जा शेष(एनर्जी बॅलन्स) ही त्याच प्रमाणामध्ये आहे जे माननीय आयोगाने एमवायटी च्या आदेशामध्ये संमत केले आहे.

### २.४ वीज खरेदी किंमत (पॉवर परचेस कॉस्ट)

आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज खरेदीसाठी झालेल्या खर्चाचा सारांश खालीलप्रमाणे:

कोष्टक २.१: आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज खरेदी किंमत

(टेबल 1: आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज खरेदी किंमत)

| **विजेचा स्त्रोत (निर्मिती संच निहाय)** | **एमवायटी आदेश** | | | **अचूक समायोजनासाठी वास्तविक** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **एमबीपीपीएल च्या परीघामध्ये प्राप्त झालेले युनिट (एमयू)** | **खरेदी करण्यात आलेल्या ऊर्जेची एकूण किमत (रु.कोटी)** | **खरेदी केलेल्या ऊर्जेची सरासरी (रु. / केडबल्यूएच)** | **एमबीपीपीएल च्या परीघामध्ये प्राप्त झालेले युनिट (एमयू)** | **खरेदी करण्यात आलेल्या ऊर्जेची एकूण किमत (रु.कोटी)** | **खरेदी केलेल्या ऊर्जेची सरासरी (रु. / केडबल्यूएच)** |
| बाहेरील राज्यांकडून जीईपीएल | ३९.२७ | १५.९७ | ४.०७ | ३९.२७ | १५.९७ | ४.०७ |
| राज्यामधूनजीईपीएल | ४२.१८ | १७.०९ | ४.०५ | ४२.१८ | १७.०९ | ४.०५ |
| इमबलेन्स पूल | ०.३६ | - | - | ०.३६ | १.२० | |
| आरईसी खरेदी | - | १.१७ | | - | १.१७ | |
| यूआय सेटलमेंट | - | ०.२६ | | - | - | |
| **Total** एकूण | **८१.८१** | **३४.४९** | **४.२३** | **८१.८१** | **३५.४३** | **४.३३** |

**२.५ प्रचालन आणि देखभाल खर्च (ऑपरेशन अ‍ॅण्ड मेंटेनन्स)**

एमईआरसी एमवायटी नियमावली (रेग्युलेशन्स), २०११ च्या अंमलबजावणीच्या (इम्प्लीमेंटेशन) दिनांकानंतर एमबीपीपीएलला वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी (स्पेसिफिक कंडीशन्स ऑफ डस्ट्रब्युशन लायसेन्स) जारी करण्यात आल्या होत्या. त्याशिवाय एमईआरसी एमवायटी नियमावली (रेग्युलेशन्स), २०११ मध्ये एमबीपीपीएल च्या ५ प्रचालन आणि देखभाल खर्च निश्चित करण्यासाठी कोणतेही मानदंड किंवा पद्धत कार्यपद्धती  नमूद करण्यात आलेली नाही. माननीय आयोगाने एमबीपीपीएल चा प्रचालन आणि देखभाल खर्च त्यांच्या विशिष्ट प्रकरणानुसार निश्चित करणे आवश्यक आहे. याचिका क्र. १०/२०१६ मधील एमवायटी आदेशामध्ये माननीय आयोगाने टीपीसी-डी च्या प्रचालन आणि देखभाल खर्च मानदंडाच्या आधारे आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता एमबीपीपीएल करीता प्रचालन आणि देखभाल ह्यासाठीच्या खर्चाला मान्यता दिली आहे.

एमबीपीपीएल ने प्रचालन आणि देखभाल खर्चाच्या अस्विकृतीवर आणि अस्विकृती ज्यावर आधारित आहे त्यावर पुनरीक्षण याचिका (रिविह्यू पिटीशन) दाखल केली आहे. आदेशाचे पुनर्निरीक्षण करताना माननीय आयोगाने पुनर्निरीक्षण याचिकेमध्ये एमबीपीपीएलद्वारे करण्यात आलेल्या युक्तिवादावर संबोधन केलेले नाही आणि एमवायटी आदेशामध्ये युक्तिवादाचा केवळ पुन्हा उल्लेख केला आहे आणि कोणत्याही अतिरिक्त प्रचालान आणि देखभाल खर्चाला मान्यता मिळण्यासाठी सविस्तर स्पष्टीकरण आणि तर्क नमूद केले आहेत.

**कर्मचारी खर्च**

केआरसीएसपीएलशी झालेल्या करारामधील अटीच्या अनुसार प्रतिवर्ष १२% दर वाढीने एमबीपीपीएल केआरसीएसपीएलला वीज विक्रीवर प्रती युनिट ३५ पैसे दराने देय असेल.

**प्रशासकीय आणि सर्व साधारण खर्च**

एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता वास्तविक प्रशासकीय आणि सर्वसाधारण खर्च नमूद केला आहे.

**दुरुस्ती आणि देखभाल खर्च**

दुरुस्ती आणि देखभाल खर्चाच्या संदर्भात एमबीपीपीएल ने वत्स इलेक्ट्रिक सोबत वीज वितरण प्रणालीच्या दुरुस्तीसाठीचा करार केला आहे. एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वास्तविक देखभाल खर्च आणि नमूद केला आहे

ह्याशिवाय आर-इन्फ्रा-डी च्या प्रकरणात माननीय आयोगाने बहु वर्षीय वीज दर नियमन २०११ च्या नियमापासून फारकत घेत आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ चा दुरुस्ती आणि देखभाल

खर्च तपशिलवार तपासणीच्या आधारावर बहु वर्षीय वीज दर नियमन २०११ दुरुस्ती व देखभाल खर्च विषयक नियम न लावता दुरुस्ती व देखभाल नियमातून प्रमाणक खर्च प्रतिबिंबित होत नसल्याचे विचारात घेऊन वास्तविक खर्चास मान्यता दिली आहे.

माननीय आयोगाने बहु वर्षीय दर नियमन, २०११ दरम्यानच्या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्यामधील वीज वितरण परवाना धारकास वास्तविक दुरुस्ती आणि देखभाल खर्चास, बहू वर्षीय दर नियमन, २०११ मधील दुरुस्ती आणि देखभाल खर्च ह्यासंदर्भात नियम योग्य नसल्याचे नमूद करत संमती देण्यात आली आहे. हे तर्क एमबीपीपीएलच्या बद्दल थेटपणे लागू होत आहेत कारण टी.पी.सी.डी. चे दुरुस्ती आणि देखभाल संदर्भात नियम एमबीपीपीएलला लागू करण्यात आलेले आहेत जे की एमबीपीपीएल चे दुरुस्ती आणि देखभाल खर्चाचे मापदंड नाहीत.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, एमबीपीपीएल आदरपूर्वक नमूद करते की लेखा परिक्षीत हिशोबामध्ये दाखविल्यानुसार एमबीपीपीएल द्वारे करण्यात आलेल्या वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चाला मान्यता प्राप्त होण्यासाठी योग्य पद्धतीने समर्थन आणि तर्कसंगती देण्यात आली आहे.

म्हणून एमबीपीपीएल माननीय आयोगाला अशी विनंती करत आहे की वायर बिझनेस साठी करण्यात आलेल्या वास्तविक दुरुस्ती आणि देखभाल खर्चाला आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी अचूक समायोजानमधील मधील रिटेल सप्लाय व्यवसायामधील रु. १.७३ कोटीच्या खर्चाला देखील मान्यता देण्यात यावी.

आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता अचूक समायोजन वास्तविक खर्चाला मान्यता मिळण्यासाठी, कार्यक्षमता वाढल्याचा/ कमी झाल्याचा हिशोबाची कोणतीही समर्पकता नाही, जे झाले नाही.

### २.६ गुंतवणूक खर्च आणि भांडवलीकरण (कॅपिटल एक्स्पेंडीचर ॲण्ड कॅपिटलआयझेशन)

एमवायटी आदेशामध्ये माननीय आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता सुरवातीची शिल्लक (ओपनिंग बॅलन्स) म्हणून रु.४४.७२ कोटी गुंतवणूक खर्च म्हणून दाक्विण्यास मान्यता दिली आहे, जे एमबीपीपीएल च्या रु.८८.७० कोटीच्या दाव्या पेक्षा कमी आहे जे एमटीआर याचिकेच्या वेळी केलेल्या तपशिलवार आधारे आहे. एमबीपीपीएलने तात्पुरत्या स्वरूपामध्ये मान्य केलेल्या भांडवली खर्चासहित सर्व माहिती, कागदपत्रे, आणि तर्क माननीय आयोगाच्या समोर मान्यतेसाठी सादर केले आहेत आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या सुरवातीस लागलेल्या भांडवली खर्चास तपशिलवार तपास आणि छाननी नंतर मान्यता देण्याची आयोगाकडे विनंती करण्यात आली आहे. एमटीआर याचिकेच्या कारणासाठी एमबीपीपीएल जीएफएची सुरवातीची शिल्लक रु. ४४.७२ कोटी त्यानुसार विचारात घेतली, ज्यास माननीय आयोगाने एमटीआर आदेशामध्ये मान्यता दिली आहे

सदर एमटीआर याचिकेच्या कारणासाठी एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्येवास्तविक भांडवलीकरण रु. ७.५९ कोटी आणि वायर्स बिझनेस आणि सप्लाय बिझनेस करीता रु. ०.२५ कोटी विचारात घेतले आहेत.

**२.७ ऋण: भांडवल गुणोत्तर (डेब्ट: इक्विटी रेषो):**

एमबीपीपीएलने एमईआरसी एमवायटी नियमावली, २०११ च्या नियमावली ३० च्या अनुषंगाने भांडवली करणाच्या निधीकरण (फंडिंग) विचारात घेतले आहे ज्यानुसार, ग्राहकांचे योगदान वगळता उरलेल्या निधीवर ७०:३० च्या ऋण भांडवल गुनोत्तरला मान्यता दिली आहे.

**२.८ घसारा:**

एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता घसाऱ्याची (डेप्रीसिएशन) आकडेवारी एमईआरसी एमवायटी, नियमावली, २०११ च्या नियम ३१ च्या अनुसार वार्षिक  जीएफएच्या सरासरीवर विचारात घेतली आहे. वीज वितरणाचे कामकाज  ९ एप्रिल २०१५ पासून सुरु झाले असल्याने घसाऱ्याची आकडेवारी ९ एप्रिल २०१५ पासून ग्राह्य धरण्यात आली आहे. त्याशिवाय, ग्राहक योगदानाद्वारे निधीबद्ध संपत्तीवरील घसारा विचारात घेतला गेलेला नाही.

**२.९ दीर्घ मुदतीच्या कर्ज भांडवलावर व्याज (इंटरेस्ट ऑन लॉग - टर्म लोन कॅपिटल)**

एमबीपीपीएलने वरील परिच्छेदामध्ये नमूद करण्यात आल्या प्रमाणे भांडवलीकरणाच्या विरुद्ध निर्देशात्मक कर्जावरील व्याज हिशोबात घेतले आहे. कर्जाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी निर्देशात्मक पद्धतीने ७०:३० असे गुणोत्तर प्रमाण ग्राहय धरण्यात आले आहे. बहु वर्षीय नियमन, २०११ च्या नियम क्र. ३३.६ अनुसार कर्जावरील व्याजाची गणना निर्देशात्मक कर्जावर म्हणजेच ११.१५% च्या भारीत सरासरी लावून निश्चित करण्यात आली आहे. तसेच ६२.१० कोटीच्या प्रमानात्मक कर्जाचे मे २०१५  मध्ये आयडीएफसी बँकेकडून ११.१५% व्याज दराने वास्तविक कर्ज घेऊन पुनर्वित्तीयकारण करण्यात आलेले आहे. त्यानुसार एमबीपीपीएलने पुनर्वित्तीय कर्जाच्या आधारावर नमूद केले आहेत. अबू बहु वर्षीय नियमन २०११ च्या नियम ३३ अनुसार दीर्घ मुदतीच्या भांडवलावरच्या व्याजाची गणना करण्यात आलेली आहे.

**२.१० खेळत्या भांडवलावरील व्याज**

वितरण वायर्स आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय घटकासाठी एमईआरसी एमवायटी नियमावली, २०११ च्या नियम ३५ च्या अनुसार खेळत्या भांडवलावरील व्याज हिशोबामध्ये घेण्यात आले आहे. सध्याची याचिका दाखल केल्याच्या दिवसापासून १४.०५% स्टेट बँकेच्या अग्रिम दरांचा १४.०५% विचार करण्यात आला आहे.

**२.११ ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज (इंटरेस्ट ऑन कन्झ्युमर सिक्युरिटी डिपॉझिट)**

आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये बहुवर्षीय दर आदेशामध्ये गृहीत धरलेल्या रु. ३.७९ कोटी रकमेच्या समोर रु. ३.५७ कोटीच्या ग्राहक अनामत ठेवी (सी.एस.डी) गोळा करण्यात आल्या आहेत. एमबीपीपीएल ने लेखा परीक्षित हिशोबामध्ये नमूद करण्यात आल्या प्रमाणे रु. ०.३२ कोटीच्या आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये सीएसडी भरणा वरील वास्तविक व्याजाचा दावा केला आहे.

**२.१२ भागभांडवलावरील परतावा**

एमबीपीपीएलने भागभांडवलावरील परताव्याची गणना संयुक्तपणे केली आहे. ज्याअर्थी एम.ई.आर.सी. बहु वर्षीय नियमन, २०११ अनुसार वितरण वायर्स आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी परतावा दर अनुक्रमे १५.५% आणि १७.५% असे नमूद करण्यात आले आहे.

**२.१३ आयकर (इनकम टॅक्स)**

माननीय आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या अचूक समा योजनेच्या वेळेस हे नमूद केल्या प्रमाणे स्वीकार्य आयकराची गणना वास्तविक उत्पन्न आणि खर्चानुसार करण्यात येईल. तस्तम दृष्टीकोन हा अन्य वीज वितरण परवानाधारकांसाठी जसे की आर इंफ्रा डी आणि टीपीसी - डी ज्यांचा नियमन व्यवसाय हा कंपनीचा एक भाग आहे आणि ज्यासाठी आयकर भरणा नियमन व्यवसायासाठी वेगळा न भारता पूर्ण कंपनीसाठी भरण्यात येतो.

त्यानुसार, आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता नियमित वितरण परवाना व्यवसायाकरीता आयकर एमबीपीपीएल ने हिशोब केला आहे, जे सदर याचिकेमधील ट्रू अप करीता महसूल आणि करण्यात आलेल्या खर्चावर आधारित आहे. माननीय आयोगाद्वारे विहित करण्यात आलेल्या फॉरमॅटच्या फॉर्म १२ मध्ये देण्यात आलेल्या आयकराच्या हिशोबामध्ये तपशिलामध्ये देण्यात आले आहे जे सदर याचिका सादर करतानाचे कागदपत्र सोबत जोडण्यात आली आहेत.

**२.१४ बुडीत कर्जासाठी तरतूद (प्रोव्हिजनिंग फॉर बॅड डेब्ट**

एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीताच्या त्यांच्या लेखा परीक्षणामध्ये बुडीत कर्जासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही.

**२.१५ आकस्मिक निधीसाठी बर्गणी**

याचिका क्र. १०/२०१६ मध्ये माननीय आयोगाच्या द्वारे मान्य कारण्यात आल्या नुसार  जीएफएच्या सुरवातीच्या ०.५०% दराने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता आकस्मिक राखीव चे योगदान विचारात घेण्यात आले आहे.

**२.१६ वीज दराच्या व्यतिरिक्त उत्पन्न (नॉन टॅरिफ इन्कम)**

आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता करण्यात आलेल्या लेखा परीक्षणाच्या आधारवर रु. ०.२९ कोटीच्या वास्तविक वीज दाराच्या व्यतिरिक्त (नॉन टॅरिफ इन्कम) एमबीपीपीएल ने विचारात घेतले आहे ज्यामध्ये सेवा जोडणी आणि अन्य प्रभार आणि विद्युत ठेविमधील उत्पन्न ह्यामधील उत्पन्नाचा सामवेश करण्यात आलेला आहे.

**२.१७ विजेच्या विक्रीमधून महसूल (रेवेन्यू फ्रॉम सेल ऑफ इलेक्ट्रिसिटी)**

असे नमूद करण्यात यावे की एमबीपीपीएलच्या वीज वितरण परवाना असेलेल्या क्षेत्रामध्ये मंजूर करण्यात आलेला कमाल वीज दर, जो महावितरणाच्या मंजूर करण्यात आलेल्या दरावर आधारित होता त्यामुळ वहन आणि किरकोळ वीज पुरवठा ह्यापासून मिळणारे उत्पन्न हे वेगळे करता येउ शकत नाही आणि त्यामुळे एमबीपीपीएलच्या आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या उत्पन्नाचा संयुक्तपणे विचार करण्यात यावा.

**२.१८ एकूण महसुली गरज**

आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एमबीपीपीएलच्या एकूण महसुली गरजेचा सारांश खालीलप्रमाणे:

**टेबल २-२: आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता सरासरी महसूल आवश्यकता**

| अनु. क्र | तपशील | एमवायटी आदेश | | | ट्रू अपकारिता वास्तविक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकत्रिकृत एआरआर | वायर्स बिझनेस | सप्लायर्स बिझनेस | एकत्रिकृत एआरआर | वायर्स बिझनेस | सप्लायर्स बिझनेस |
| १ | ऊर्जा खरेदी किमत (इन एसटीएस खर्चासह आणि एमएसएलडीसी शुल्क आणि खर्च | ३४.४९ | - | ३४.४९ | ३५.४३ | - | ३५.४३ |
| २ | ओ आणि एम खर्च | ३.०८ | २.०७ | १.०१ | ४.९४ | ३.२१ | १.७३ |
| ३ | घसारा | २.१९ | २.१० | ०.०८ | २.३६ | २.२८ | ०.०८ |
| ४ | कर्ज भांडवलावरील व्याज | ३.४२ | ३.३० | ०.१२ | ३.९४ | ३.८३ | ०.११ |
| ५ | कार्यातील भांडवला वरील | ०.४३ | ०.०४ | ०.३९ | ०.५० | ०.०५ | ०.४५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्याज | | | | | | |
| ६ | सीएसडी वरील व्याज | ०.२९ | ०.०३ | ०.२६ | ०.३२ | ०.०३ | ०.२९ |
| ७ | बुडीत आणि अनिश्चित कर्जासाठी तरतूद | - | - | - | - | - | - |
| ८ | आकस्मिक राखीवचे योगदान | ०.२२ | ०.२२ | ०.०१ | ०.२३ | ०.२२ | ०.०१ |
| ९ | आयकर | ०.५० | ०.४५ | ०.०५ | २.२२ | २.०० | ०.२२ |
| १० | **एकूण महसूल खर्च** | **४४.६२** | **८.२१** | **३६.४१** | **४९.९३** | **११.६२** | **३८.३१** |
| ११ | अधिक: इक्विटीवरील परतावा | २.१२ | २.०३ | ०.०८ | २.२४ | २.१४ | ०.१० |
| १२ | **सरासरी महसूल आवश्यकता** | **४६.७४** | **१०.२४** | **३६.४९** | **५२.१८** | **१३.७७** | **३८.४१** |
| १३ | वजा: नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.०२ | - | ०.०२ | ०.३० | - | ०.३० |
| १४ | वजा: अन्य व्यवसायामधील उत्पन्न | - | - | - | - | - | - |
| १५ | एकूण सरासरी महसूल उप्तन्न | **४६.७२** | **१०.२४** | **३६.४८** | **५१.८८** | **१३.७७** | **३८.१२** |
| १८ | विजेच्या विक्रीमधून उत्पन्न | **५८.८०** | | | **५८.१७** | | |
| **१९** | **महसूल जीएपी/(अतिरिक्त)** | **(१२.०८)** | | | **(६.२९)** | | |

**२.१९ महसूल तूट/(अतिरिक्त)**

एमव्हायटी आदेशामध्ये माननीय आयोगाने ह्यापूर्वीच आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता तात्पुरते अचूक समायोजन नंतर हिशोबामध्ये धरण्यात आलेल्या रु. १२.०८ कोटी महसुली अतिरिक्त च्या द्वारे एमव्हायटी नियंत्रण कालवधी मध्ये चार वर्षांमध्ये समान पद्धतीने म्हणजेच रु. ३.०२ कोटी असे आर्थिक वर्ष २०१५-१६ पासून २०१९-२० पर्यंतच्या कालावधीसाठी करण्यात आले आहे. बदलण्यात आलेली दरसूची आर्थिक वर्ष २०१५-१६ आणि २०१६ - १७ साठी अचूक समायोजन करण्यात आल्या नंतर माननीय आयोगाद्वारे मंजूर करण्यात येईल. श्रेणी निहाय (कॅटेगिरीवाईज) मंजूर दरपत्रके आर्थिक वर्ष २०६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ ही ह्यापृवीच कमी करण्यात आलेली आहेत. आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एमबीपीपीएल द्वारे अतिरिक्त महसूल रु. ६.२९ कोटीने कमी झाल्यामुळे एमबीपीपीएल ने खालील प्रकारे अतिरिक्त महसूल विस्तारित केला आहे.

**टेबल २-३: म्हसुलामधील तूट /(अतिरिक्त) आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता.**

| **अनु .क्र** | **तपशील** | **एमवायटी आदेश** | **अंतिम** अचूक |
|---|---|---|---|

| | | | समायोजनाच्या नंतर |
|---|---|---|---|
| ए | महसुलामधील तूट (अतिरिक्त)एआरआर मध्ये समायोजित करण्यात आल्या नुसार | | |
| १ | आर्थिक वर्ष २०१६-१७ | (३.०२) | (३.०२) |
| २ | आर्थिक वर्ष २०१७-१८ | (३.०२) | (३.०२) |
| ३ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | (३.०२) | (०.२५) |
| ४ | आर्थिक वर्ष २०१९-२० | (३.०२) | - |
| | **Total (एकूण)** | **(१२.०८)** | **(६.२९)** |

त्यानुसार वरील महसुलामधील तूट / (अतिरिक्त) क्म्युलेटिव्ह रेवेन्यू गॅप/ अतिरिक्त आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता हिशोबात घेण्यात आले आहे.

**३. आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन**

एमवायटी नियमावली २०१५ च्या नियम ८.२ च्या अनुषंगाने मध्यावधी पुनर्निरीक्षण याचिकेमध्ये वास्तविक कार्याप्रदर्शन कामगिरी आणि आर्थिक कुशलता (पर्फोर्मन्स) व त्याचा स्वीकृत अंदाज ह्याची तुलना समोरासमोर आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ ह्या पहिल्या दोन वर्षांसाठी वर्तवण्यात यावे.

त्यानुसार एमबीपीपीएल ने  आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन दाखल केले आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन एमवायटी नियमावली २०१५ च्या लागू असणाऱ्या नियमावलीच्या अनुषंगाने  एमबीपीपीएलच्या वितरण परवाना व्यवसायाचे विभागिय हिशोबाचे समीक्षण समीक्षण करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीच्या एमबीपीपीएलच्या वितरण परवाना धारक व्यवसायामधील विभागिय लेखापरीक्षित हिशोब हे याचिकेमध्ये जोडण्यात आले आहेत.

आर्थिक वर्ष २०१७-१८ हे ह्यापूर्वीच संपलेले असल्याने ऊर्जा विक्री, ऊर्जा खरेदी आणि महसूल ह्यांचे वास्तविक मूल्य वास्तविक मूल्य आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी विचारात घेतले गेले आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन हे वास्तविक ऊर्जा विक्रीचे मूल्य, ऊर्जा खरेदी, महसूल आणि भांडवलीकरणाचे अंदाजे मूल्य आणि इतर महसुली खर्च ह्यावरून आणि एमवायटी नियमावली, २०१५ मधील लागू असणाऱ्या तरतुदींच्या अनुसार तयार करण्यात आले आहे.

### ३.१ ऊर्जा विक्री

आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता मंजूर करण्यात आलेल्या ९४.१९ एमयू विक्रीशी तुलना केले असता आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी वास्तविक विक्री झालेली ऊर्जा ही कमी म्हणजेच ८२.८८ एमयू इतकी आहे. वास्तविक विक्री कमी होण्याचे खरे कारण इमारत क्र. ९ आणि १२ मधील अंशिक व्याप्ती (पार्शल ओक्युपन्सी) हे आहे. अचूक समायोजन करण्याच्या कारणासाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी वास्तविक ऊर्जा विक्री विचारत घेण्यात आली आहे.

तातुपुरते अचूक समायोजन करण्यासाठी आर्थिक वर्ष २०१७-१८ एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता वास्तविक ऊर्जा विक्री विचारात घेतली आहे.

### ३.२ वितरण तोटा

एमवायटी आदेशामध्ये माननीय आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ पासून आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंतच्या नियंत्रण कालावधीसाठी ०.६४% वितरणामधील तोटा हा परिवर्तनीय तोट्यानंतर आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता वास्तविक वितरण तोटा ह्यास मान्यता दिली आहे.

वास्तविक ऊर्जा विक्री आणि ऊर्जा खरेदी याचा विचार केल्या नंतर एमएसएलडीसी द्वारे देखभाल होत असलेल्या वास्तविक राज्यामधील प्रेषण (ट्रान्समिशन) तोटा विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी वास्तविक वितरण तोटा अनुक्रमे ०.८०% आणि ०.९१% अनुक्रमे नोंदविण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अचूक समायोजन साठी आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरत्या अचूक समायोजन साठी ह्याचा दावा करण्यात आला आहे.

### ३.३ ऊर्जा खरेदी खर्च

वास्तविक ऊर्जा खरेदीचा हिस्सा आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी करीता खर्च हे खालील कोष्ट्कामध्ये मध्ये दाखविण्यात आले आहे.

टेबल ३-५: आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी ऊर्जा खरेदी खर्च

| ऊर्जा स्त्रोत (संच निहाय) | एमवायटी आदेश | | | अचूक समायोजन साठी वास्तविक | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिस्सा (एमयू) | खर्च (रु.मध्ये) | प्रती युनिट खर्च (रु./ केडब्ल्यूएच) | हिस्सा (एमयू) | खर्च (रु.मध्ये) | प्रती युनिट खर्च (रु./ केडब्ल्यूएच) |
| अल्प कालीन स्त्रोताकडून खरेदी | २०.८२ | ८.०८ | ३.८८ | २३.३६ | ८.८२ | ३.७८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मध्यम - कालीन पीपीए - बेस लोड | ५५.९० | २०.७९ | ३.७२ | ६२.६६ | २१.२५ | ३.३९ |
| मध्यम - कालीन पीपीए - पिक लोड | २५.२५ | ९.३९ | ३.७२ | १८.९९ | ७.८४ | ४.१३ |
| अतिरिक्त विजेची विक्री | (३.२९) | (१.२२) | ३.७२ | (१५.२२) | (४.७४) | ३.११ |
| इमबॅलन्स पूल | - | - | - | (३.०९) | - | - |
| रिबेट | - | - | - | - | (०.३०) | - |
| सोलर आरईसी खरेदी | - | ०.३५ | ३.५० | - | ०.२६ | - |
| नॉन सोलर खरेदी | - | १.४८ | १.५ | - | १.२६ | - |
| एकूण (टोटल) | ९८.६७ | ३८.८६ | ३.९४ | ८६.७० | ३४.३९ | ३.९७ |

आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता वास्तविक खरेदी करण्यात आलेली ऊर्जा आणि त्याचे शुल्क खालच्या कोष्टका मध्ये दाखविण्यात आले आहे.

**टेबल ३-६: आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता ऊर्जा खरेदी खर्च**

| ऊर्जा स्त्रोत (संच निहाय) | एमवायटी आदेश | | | अचूक समायोजन साठी वास्तविक | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिस्सा (एमयू) | किमत (रु. मध्ये) | प्रती युनिट किमत (रु./केडब्ल्यूएच) | हिस्सा (एमयू) | किमत (रु. मध्ये) | प्रती युनिट किमत (रु./केडब्ल्यूएच) |
| मध्यम कालीन पीपीए - बेस लोड | ७४.४६ | २७.७० | ३.७२ | ७७.५१ | २७.३६ | ३.५३ |
| मध्यम कालीन पीपीए -पिक लोड | ३३.६६ | १२.५२ | ३.७२ | २७.९० | ११.२० | ४.०२ |
| अतिरिक्त ऊर्जेची खरेदी | - | - | - | (१७.५२) | (६.२३) | ३.९७ |
| इमबॅलन्स पूल | -- | -- | -- | २.६४ | - | - |
| रिबेट | - | - | - | - | (०.३५) | - |
| सोलर आरईसी खरेदी | - | ०.७९ | ३.५० | - | ०.०२ | - |
| नॉन सोलर खरेदी | - | १.७७- | १.५० | - | १.५१ | - |
| एकूण (टोटल) | ११२.१९ | ४४.२९ | ३.९५ | ८७.०५ | ३३.५० | ३.८५ |

**३.४ प्रचालन आणि देखभाल खर्च:**

निर्देशात्मक ओ आणि एम खर्चाची मोजणी करण्यासाठी आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता अचूक समायोजनसाठी दावा करण्यात आलेले वास्तविक ओ आणि एम खर्च मूळ ओ आणि एम मूल्य म्हणून विचारात घेण्यात आले आहे. त्याशिवाय आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी निर्देशात्मक ओ आणि एम खर्च हे वृद्धी नियम लागू करून साधित केली आहेत. एमबीपीपीएलद्वारे उद्भवलेले वास्तविक ओ आणि एम खर्च मान्य करण्यासाठी आर्थिक वर्ष २०१७=१८ करीताच्या लेखा परीक्षित अहवालामध्ये नमूद केल्यानुसार देण्यात आले आहेत.

ह्याशिवाय आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता तात्पुरत्या स्वरूपाच्या अचूक समायोजन करण्यासाठी आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या पहिल्या सहामाहीसाठी वास्तविक ओ आणि एम खर्च विचारात घेण्यात आले आहेत. आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या दुसऱ्या सहामाहीच्या कालावधीसाठी खर्चाच्या सध्याचे कंत्राट सेवा आणि पूर्वी वापर केलेल्या ह्याच्या आधारावर अनुमान काढण्यात आले आहे.

**३.५ भांडवलीकरण**

आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या दरम्यान, एमबीपीपीएलने नॉन डीपीआर योजनेमधून रु. ०.५५ कोटी वास्तविक भांडवलीकारण प्राप्त केले आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी एमबीपीपीएल ने नॉन डीपीआर योजनेमधून रु. ०.४२ कोटी  भांडवल खर्च आणि भांडवलीकरण ह्यांचे अनुमान घेतले आहे.

आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या अचूक समायोजन साठी आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या  तात्पुरत्या अचूक समायोजन साठी एमबीपीपीएल ने एमवायटी नियमावली, २०१५ च्या नियमावली २६ च्या अनुषंगाने मानदंडात्मक कर्ज रोख्यांचा ७०:३० ह्या प्रमाणामध्ये विचार केला आहे.

**३.६ घसारा**

एमबीपीपीएल ने एमवायटी नियमावली, २०१५ च्या नियमावली २७ च्या अनुषंगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी, एमवायटी नियमावली. २०१५ मध्ये नमूद करण्यात आल्या नुसार संपतीच्या प्रकारानुसार घसाऱ्याचा दर लावण्यात येउन घसारा हिशोबामध्ये घेण्यात आला आहे.

**३.७ दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज**

एमवायटी नियमावली, २०१५ च्या नियमावली २९ च्या अनुषंगाने एमबीपीपीएल ने दीर्घ मुदतीवरील कर्ज भांडवलावरील व्याज विचारात घेतले आहे. एमवायटी नियमावली, २०१५ च्या नियमावली २९.५ च्या अनुषंगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता १०.५७% आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता १०.४५% दराने परी गणना केलेला भारांकित सरासरी व्याज दर चा वापर करून निर्देशात्मक कर्जावर सरासरी मांडण्यात आली आहे.

### ३.८ भागभांडवलावरील परतावा

एमवायटी नियमावली, २०१५ च्या नियमावली २८ च्या अनुषंगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता एमबीपीपीएलने आरओई हिशोबामध्ये घेतले आहे. एमबीपीपीएलने वायर्स बिझनेस आणि सप्लाय बिझनेस साठी १५.५०% आणि १७.५०% दराने आरओई हिशोबामध्ये घेतले आहे.

### ३.९ खेळत्या भांडवलावरील व्याज आणि ग्राहकांच्या सुरक्षित ठेवींवरील व्याज

एमवायटी नियमावली, २०१५ च्या मान्यतेनुसार निर्देशात्मक कामातील गुंतवणूकीची गणना केली आहे जी अगोदरच्या परिच्छेदांमध्ये वैयक्तिक घटक म्हणून समजण्यात आले आहे. सीएसडीच्या संदर्भात आर्थिक वर्ष २०१६-१७साठी वास्तविक सीएसडी रु. ३.८४ कोटी जमा झाले होते. लेखा परीक्षित हिशोबामध्ये दाखविण्यात आल्यानुसार आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता भरणा करण्यात आलेल्या सीएसडीवर रु. ०.३४ कोटी व्याजाचा दावा एमबीपीपीएलने केला आहे.

### ३.१० आयकर

आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता कर पूर्व नियामक नफा आयकर विभागाने हिशोबामध्ये घेतला आहे. त्याशिवाय, एमवायटी आदेशामध्ये आयोगाने असे म्हटले आहे की जिथे वास्तविक माहिती उपलब्ध नसेल त्याठिकाणी आगामी वर्षांकरीता आर ओ ई पद्धतीवर आधारित हिशोबामध्ये घेण्यात आले आहे. एमबीपीपीएलच्या संदर्भात आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता ढोबळ आरओ-ई पद्धतीवर आयकराचा अंदाज घेतला गेला आहे.

### ३.११ बुडीत आणि अनिश्चित कर्जासाठी तरतूद

आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी बुडीत आणि अनिश्चित कर्जावरील व्याजासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

### ३.१२ आकस्मिक राखीवचे योगदान

एमवायटी नियमावली, २०१५ च्या संदर्भात आणि एमवायटी आदेशामध्ये माननीय आयोगाद्वारे घेण्यात आलेले धोरण ह्यानुसार एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीटा कायम मालमत्तेच्या एकम मूल्याच्या ०.५% आकस्मिक खर्च हिशोबांध्ये ग्राहृय धरण्यात आले आहे.

### ३.१३ नॉन टॅरिफ उत्पन्न:

आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या लेखा परीक्षित हिशोबाच्या आधारे रु.०.३० कोटी वास्तविक टॅरिफ उत्पन्न विचारात घेण्यात आले आहे. ज्यामध्ये सेवा जोडणी आणि अन्य शुल्क आणि वीज ठेवींमधील उत्पन्नामधून एकत्रित केले आहे. त्याशिवाय आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या तात्पुरत्या अचूक समायोजन साठी सेवा जोडणी शुल्क हे आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या प्रत्यक्ष उत्पन्न खर्चावरून विचारात घेतले आहे.

### ३.१४ आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता सरासरी महसूल आवश्यकता

आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता डस्ट्रब्युशन वायर्स बिझनेस करीता एआरआरचा सारांश खालील टेबल मध्ये देण्यात आला आहे.

टेबल ३-१: वायर्स व्यवसायाकरीता आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता एआरआरचा सारांश (रु. कोटींमध्ये)

| अनु. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१६-१७ | | आर्थिक वर्ष २०१७-१८ | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | अचूक समायोजन साठी वास्तविक | एमवायटी आदेश | अंदाजे |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | २.१८ | ३.३७ | २.२४ | ३.५५ |
| २ | घसारा | २.२६ | २.५२ | २.३७ | २.५४ |
| ३ | कर्ज भांडवलावरील व्याज | ३.१९ | ३.४१ | ३.११ | ३.१४ |
| ४ | खेळत्या भांडवलावर व्याज | ०.०१ | ०.०१ | ०.०१ | - |
| ५ | ग्राहक आणि वितरण व्यवस्था वापरकर्ते ह्यांच्या ठेवींवरील व्याज | ०.०५ | ०.०३ | ०.०६ | ०.०४ |
| ६ | बुडीत आणि अनिश्चित कर्जांची तरतूद | - | - | - | - |
| ७ | आकस्मिक राखीव करीता योगदान | ०.२३ | ०.२५ | ०.२४ | ०.२६ |
| ८ | आयकर | ०.४५ | ०.३० | ०.४५ | ०.५७ |
| ९ | एकूण महसूल खर्च | ८.३९ | ९.९० | ८.४८ | १०.१० |
| १० | अधिक: समभाग भांडवलाचा परतावा | २.१६ | २.३८ | २.२६ | २.४० |
| ११ | सरासरी महसुली आवश्यकता | १०.५५ | १२.२८ | १०.७५ | १२.५० |
| १२ | वजा: नॉन टॅरीफ उत्पन्न | - | - | - | - |
| १३ | वजा: अन्य व्यवसायामधून उत्पन्न | - | - | - | - |
| १४ | एकूण: सरासरी महसूल आवश्यकता | १०.५५ | १२.२८ | १०.७५ | १२.५० |

आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता किरकोळ पुरवठा व्यवसायासाठी एआरआर चा सारांश खालील टेबल मध्ये दाखविण्यात आला आहे:

टेबल ३-२: आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता किरकोळ पुरवठा व्यवसायासाठी एआरआर सारांश (रु. कोटींमध्ये)

| अनु. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता | | आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | अचूक समायोजन साठी वास्तविक | एमवायटी आदेश | अंदाजे |
| १ | ऊर्जा खरेदी खर्च (राज्यांतर्गत प्रेषण शुल्कासह) | ३८.५६ | ३४.३९ | ४४.२९ | ३३.५० |
| २ | प्रचालन आणि देखभाल खर्च | १.०७ | १.८२ | १.१० | १.९१ |
| ३ | घसारा | ०.१० | ०.०९ | ०.१० | ०.०९ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ०.१३ | ०.११ | ०.१२ | ०.१० |
| ५ | कार्यातील भांडवलावरील व्याज | ०.१३ | ०.११ | ०.१२ | ०.१० |
| ६ | ग्राहक सुरक्षा ठेवींवरील व्याज | ०.४९ | ०.३१ | ०.५६ | ०.३५ |
| ७ | बुडीत आणि अनिश्चित कर्जासाठी तरतूद | - | - | - | - |
| ८ | अनिश्चित राखीवसाठीचे योगदान | ०.०१ | ०.०१ | ०.०१ | ०.०१ |
| ९ | राज्यांतर्गत प्रेषण शुल्क | ४.०४ | ४.८९ | ५.१८ | ५.१८ |
| १० | एमएसडीएलसी शुल्क आणि किंमत | ०.०१ | ०.०१ | ०.०२ | ०.०२ |
| ११ | आयकर | ०.०५ | ०.०३ | ०.०५ | ०.०६ |
| १२ | एकूण महसूल खर्च | ४४.८८ | ४१.७५ | ५१.५५ | ४१.२२ |
| १३ | अधिक: समभाग भांडवलावरील गुंतवणूक | ०.१० | ०.०९ | ०.१० | ०.०९ |
| १४ | सरासरी महसूल आवश्यकता | ४४.९८ | ४१.७५ | ५१.५५ | ४१.२२ |
| १५ | वजा: नॉन टरिफ उत्पन्न | ०.०१ | ०.३० | ०.०१ | ०.०५ |
| १६ | वजा: अन्य व्यास्व्सायामधून उत्पन्न | - | - | - | - |
| १७ | वजा: क्रॉस सबसिडी अधिभार वरील प्राप्ती | - | - | - | - |
| १८ | वजा: जर असल्यास अतिरिक्त अधिभार खात्यामधील जमा | - | - | -- | - |
| १९ | किरकोळ पुरवठ्यामधून सरासरी महसूल | ४४.९७ | ४१.५४ | ५१.६३ | ४१.२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | आवश्यकता | | | | |

**३.१५ आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ महसुली अंतर/ (अतिरिक्त)**

एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता संयुक्त महसुली अंतर/ (अतिरिक्त) हिशोब खालील टेबल मध्ये दाखविण्यात आला आहे.

टेबल ३-३: आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता महसुली अंतर/(अतिरिक्त) (रु. कोटी)

| अनु. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१६-१७ | | आर्थिक वर्ष २०१७-१८ | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | अचूक समायोजन करीता वास्तविक | एमवायटी आदेश | अंदाजे |
| १ | डस्ट्रब्यूशन वायर्स व्यवसायासाठी एआरआर | १०.५५ | १२.२८ | १०.75 | १२.५० |
| २ | किरकोळ पुरवठा व्यवसायासाठी एआरआर | ४४.९७ | ४१.५४ | ५१.६३ | ४१.२६ |
| ३ | वायर्स आणि किरकोळ पुरवठा व्यवसाया करीता संयुक्त एआरआर | ५५.५२ | ५३.८२ | ६२.३८ | ५३.७६ |
| ४ | अधिक: महसुली अंतर/(अतिरिक्त) आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता | (३.०२) | (३.०२) | (३.०२) | (३.०२) |
| ५ | वजा: वीज विक्री मधून महसूल | ५२.५३ | ५२.९६ | ५९.४ | ४४.७४ |
| ६ | महसूल अंतर/(अतिरिक्त) | (०.०४) | (२.१६) | (०.०४) | ६.०० |

एमबीपीपीएलने माननीय आयोगाकडे विनंती केली आहे की आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता शेवटच्या अचूक समायोजना नंतर आणि महसूल अंतर/ (अतिरिक्त) आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता तात्पुरता अचूक समायोजन वरील टेबल मध्ये दाखविण्यात आले आहे.

**४ आर्थिक वर्ष २०१८-१९ करीता आणि आर्थिक वर्ष २०१९- २० करीता सरासरी महसूल आवश्यकता**

**४.१ ऊर्जा विक्री**

एमवायटी आदेशामध्ये माननीय आयोगाने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता ११२.३७ एमयूच्या विक्रीला मान्यता दिली आहे ज्यामध्ये इमारत क्र. १५ कडील ऊर्जा विक्रीचा समावेश आहे. तथापि इमारत क्र. १५ च्या बांधकामाला विलंब (डिले) झाला आणि आणि त्याचे बांधकाम एप्रिल

२०१८ मध्ये सुरु होणे अपेक्षित होते, आणि इमारतीचे बांधकाम नियंत्रण कालावधीच्या नंतर म्हणजेच आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये पूर्ण होने अपेक्षित आहे. इमारतीच्या सद्य स्थितीवर आधारित एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता ऊर्जा विक्रीचे अंदाज वर्तवले आहेत.

### ४.२ वितरण तोटा

एमवायटी आदेशामध्ये माननीय आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता परिवर्तन नुकसान सोडल्यानंतर वास्तविक वितरण तूट ०.६४% ची वितरण तूट झाल्याचे मान्य केले आहे. एमबीपीपीएल ने २२ केव्हीच्या उच्चतम दाबावरील वितरण रचनेला प्राधान्य दिले आहे. परिणामस्वरूप, तांत्रिक नुकसानाच्या आधारावर वितरण नुकसान हे कमी झाले आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता वास्तविक वितरण तोटा हा ०.९१% इतका आहे. ह्या संदर्भात एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता वितरण नुकसानाचा अंदाज ०.९१% वर्तवला आहे.

### ४.३ ऊर्जा संतुलन

आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करींता शिल्लक उर्ज्या अंदाज घेण्यासाठी एमबीपीपीएल ने अंदाजे ऊर्जा विक्री, वितरण तोटा, आणि एमव्हायटी आदेशामध्ये माननीय आयोगाने मान्य केल्या नुसार ३.९२% इनएसटीएस विचारात घेतली. त्यानुसार एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९=२० करीता राज्याच्या परीघ क्षेत्रासाठी एमबीपीपीएल करीता उर्जेच्या गरजेचा अंदाज वर्तवला आहे.

### ४.४ ऊर्जा खरेदी खर्च

एमबीपीपीएल ने चालू याचिकेमध्ये अंदाजे ऊर्जा खरेदी खर्च हिस्सा आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी ऊर्जा खरेदीचे मूल्य खाली देण्यात आलेल्या टेबल मध्ये दाखविण्यात आले आहे.

**टेबल ४-१: एमबीपीपीएलसाठी आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता ऊर्जा खरेदी**

| तपशिल | स्त्रोत | आर्थिक वर्ष २०१८-१९ | | आर्थिक वर्ष २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | बदलेला प्रक्षेपण | एमवायटी आदेश | बदलेला प्रक्षेपण |
| ऊर्जा खरेदी प्रमाण (एमयू) | बेस लोड करीता स्त्रोत - जेपीएल | ७४.४६ | ७४.४६ | ७४.४६ | ७४.६६ |
| | पिक लोड साठी स्त्रोत - जीएमआरईटीएल | ३३.६६ | ३४.३० | ३३.६६ | ३४.४३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सोलर आरईसीची खरेदी | - | - | - | - |
| | सोलर नॉन आरईसीची खरेदी | - | - | - | - |
| | अतिरिक्त (सरप्लस) ऊर्जेची विक्री | - | (११.२४) | - | (९.६०) |
| | अतिरिक्त ऊर्जेची खरेदी | ९.५९ | - | १४.९७ | - |
| | एकूण | ११७.७१ | ९७.५२ | १२३.०९ | ९९.४९ |
| ऊर्जा खरेदी (खर्च रु.) | बेस लोड करीता स्त्रोत - जेपीएल | २७.७० | २९.२४ | २७.७० | २९.७४ |
| | पिक लोड साठी स्त्रोत - जीएमआरईटीएल | १२.५२ | १४.०१ | १२.५२ | १४.२९ |
| | सोलर आरईसीची खरेदी | १.१३ | ०.२७ | १.५१ | ०.३५ |
| | सोलर नॉन आरईसीची खरेदी | १.९४ | १.०७ | २.१२ | १.१५ |
| | अतिरिक्त (सरप्लस) ऊर्जेची विक्री | - | (3.35) | - | (2.91) |
| | अतिरिक्त ऊर्जेची खरेदी | 3.57 | - | 5.57 | - |
| | एकूण | 46.86 | 41.24 | 49.42 | 42.61 |
| सरासरी ऊर्जा खरेदी दर (रु./केडब्ल्यूएच) | मिडीयम टर्म पीपीए नुसार बेस लोड साठी स्त्रोत | ३.७२ | ३.९३ | ३.७२ | ३.९८ |
| | मिडीयम टर्म पीपीए नुसार पिक लोड साठी स्त्रोत | ३.७२ | ४.०९ | ३.७२ | ४.१५ |
| | सोलर आरईसीची खरेदी | - | -- | - | - |
| | सोलर नॉन आरईसीची खरेदी | - | -- | - | - |
| | अतिरिक्त (सरप्लस) ऊर्जेची खरेदी | - | २.९८ | - | ३.०३ |
| | अतिरिक्त ऊर्जेची खरेदी | ३.७२ | - | ३.७२ | - |
| | एकूण | ३.९८ | ४.२३ | ४.०२ | ४.२८ |

**४.५ प्रेषण किंमत आणि एमएसएलडीसी किंमत**

याचिका क्र. ९१/२०१६ मध्ये माननीय आयोगाद्वारे देण्यात आलेल्या निर्णयामध्ये निश्चित करण्यात आलेल्या नुसार एमबीपीपीएल ने प्रेषण खर्च आणि एमएसएलडीसी शुल्क प्रस्तावित केले आहे.

**४.६ प्रचालन आणि देखभाल खर्च**

सदर याचिकेच्या पूर्वीच्या अनुभागाम्ध्ये उल्लेख केल्या प्रमाणे तर्कसंगती तशीच आहे, एमबीपीपीएल ने माननीय आयोगाकडे आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता सेवांच्या सध्या चालू असलेली कंत्राट वास्तविक ओ आणि एम च्या खर्चावर आधारित आहेत.

**४.७ भांडवली खर्च आणि गुंतवणूक**

एमबीपपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता अंतर्गत जोडणीच्या वेळी (इंटरकानेक्षण पॉइंट च्या वेळी पुरवठ्याचा दर्जा कायम राखण्यासाठी ह्याची देखभाल करण्यासाठी हर्मोनिक फिल्टर्स बसविण्यासाठी  भांडवलीकारण प्रस्तावित असल्याचे म्हटले आहे. एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१८-१९ करीता ०.९० कोटी आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता ०.९० कोटी, नॉन डीपीआर योजनेसाठी असल्याचा प्रस्ताव असल्याचे म्हंटले आहे. किरकोळ पुरवठा व्यवसायाच्या मीटरिंग योजनेसाठी कोणत्याही भांडवलीकरण प्रस्तावित नसल्याचे म्हटले आहे. नॉन डीपीआर योजनेमध्ये गुंतवणुकीचा खर्च १० कोटींपेक्षा कमी असेल.

**४.८ कर्ज: समभाग गुणोत्तर**

एमईआरसी एमवायटी नियमावली २०१५ मधील नियमावली २६ च्या अनुशांगाने मानदंडा नुसार कर्ज समभाग ७०:३० असे प्रमाण विचारात घेण्यात आले आहे.

**४.९ घसारा**

एमबीपीपीएल ने एमईआरसी एमवायटी नियमावली, २०१५ च्या नियमावली २७ च्या अनुषंगाने वर्षाच्या दरम्यान सरासरी अवमूल्यन दर ५.२८% दराने आकारण्यात येऊन सरासरी घसारा वेगळा डिस्ट्रीब्यूशन वायर्स आणि रिटेल सप्लाय बिझनेस मधला घसारा वेगळा दाखविण्यात आला आहे.

**४.१० कर्जावरील व्याज**

एमबीपीपीएलने एमईआरसी एमवायटी नियमन २०१५ च्या नियम २९ च्या अनुसार कर्जावरील व्याजाची गणना केली आहे.एमबीपीपीएलच्या प्रत्यक्ष कर्जावरील भारीत सरासरी व्याजदारावर आधारित व्याज दर विचारात घेतला आहे  एमईआरसी एमवायटी नियमावली २०१५ च्या नियम ३१ अनुसार निर्देशात्मक आयओडब्ल्यूसी संयुक्त डिस्ट्रीब्यूशन वायर्स आणि रिटेल सप्लाय बिझनेस साठी विचारात घेतले आहे. सध्याची याचिका दाखल करण्याच्या वेळी व्याजाचा दर हा एका वर्षाईतका समजण्यात आला आहे. अधिक १५० बेसिस गुण म्हणजेच ९.७५%. एमवायटी नियमावली, २०१५ च्या तरतुदींच्या अनुषंगाने ग्राहक सुरक्षा ठेवींचा व्याजाचा दर देखील तितकाच ठेवण्यात आला आहे.

**४.१२ इक्विटीवरील परतावा (रिटर्न)**

एमईआरसी एमवायटी नियमावली २०१५ च्या नियम २८ च्या अनुषंगाने एमबीपीपीएलने डिस्ट्रीब्यूशन वायर्स आणि रिटेल सप्लाय बिझनेस करीता नियंत्रण कालावधीसाठी समभाग भांडवलावरील परतावा वेगळा हिशोबामध्ये घेतला आहे.

**४.१३ आयकर**

एमवायटी च्या आदेशामध्ये माननीय आयोगाने आगामी वर्षांसाठी, जर वास्तविक माहिती उपलब्ध नसल्यास आयकर हिशोबामध्ये घेण्यासाठी आरओई आधारित पद्धत वापरण्याचे निर्देश दिले आहेत. ह्यासंदर्भात एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता ढोबळ आरओ - ई पद्धतीवर आधारित आयकर प्रस्तावित असल्याचे म्हटले आहे.

### ४.१४ बुडीत कर्जासाठी तरतूद

मागील ट्रेंडवर आधारित आर्थिक वर्ष २०१८ - १९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी कोणत्याही प्रकारची थकीत येणी येणार नसल्याने एमबीपीपीएल ने बुडीत आणि अनिश्चित कर्जासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही.

### ४.१५ आकस्मिक राखीव वरील योगदान

एमवायटी आदेशामधील दृष्टीकोन माननीय आयोगाद्वारे स्वीकारण्यात आला असून एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अचल संपत्तीच्या (फिक्स्ड असेट) दराच्या ०.५% इतके आकस्मिक राखीव चे योगदान विचारत घेतले आहे.

### ४.१६ नॉन टरिफ उत्पन्न (इन्कम)

एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता मुख्यत्वे माननीय आयोगाद्वारे मान्य करण्यात आलेल्या दरांच्या अनुसुचीसह (शेड्युल) मुख्यत्वे ग्राहकांकडून आकारण्यात आलेल्या दारांच्या दिशेने प्रत्येकी रु. ०.०५ कोटी चे नॉन टरिफ उत्पन्न विचारात घेतले आहे.

### ४.१७ सरासरी महसूल मागणी

डिस्ट्रीब्यूशन वायर्स बिझनेस करीता आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता एआरआरचा सारांश खालील टेबल मध्ये दाखविण्यात आले आहे.

टेबल ४-२: आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी वायर्स बिझनेसकरीता एआरआर चा सारांश (रु. कोटींमध्ये)

| अनु. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१८-१९ | | आर्थिक वर्ष २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | बदलेले प्रक्षेपण | एमवायटी आदेश | बदलेले प्रक्षेपण |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | २.३१ | ३.९९ | २.३८ | ४.४४ |
| २ | घसारा | २.५२ | २.५८ | २.६० | २.६३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | कर्ज भांडवलावरील व्याज | ३.०९ | २.५९ | २.९३ | २.४० |
| ४ | कार्यातील भांडवलावर व्याज | ०.०१ | ०.०१ | ०.०१ | ०.०१ |
| ५ | ग्राहक आणि वितरण व्यवस्था वापरकर्ते ह्यांच्या ठेवींवरील व्याज | ०.०७ | ०.०४ | ०.०७ | ०.०४ |
| ६ | बुडीत आणि अनिश्चित कर्जांची तरतूद | - | - | - | - |
| ७ | आकस्मिक राखीव करीता योगदान | ०.२६ | ०.२६ | ०.२७ | ०.२६ |
| ८ | आयकर | ०.४५ | ०.५८ | ०.४५ | ०.५९ |
| **९** | **एकूण महसूल खर्च** | **८.७१** | **१०.०४** | **८.७०** | **१०.३८** |
| १० | अधिक: समभाग भांडवलाचा परतावा | २.४२ | २.४३ | २.४९ | २.४७ |
| ११ | सरासरी महसुली आवश्यकता | ११.१३ | १२.४८ | ११.१९ | १२.८५ |
| १२ | वजा: नॉन टॅरीफ उत्पन्न | - | - | - | - |
| १३ | वजा: अन्य व्यवसायामधून उत्पन्न | - | - | - | - |
| **१४** | **एकूण: सरासरी महसूल आवश्यकता** | **११.१३** | **१२४८** | **११.१९** | **१२.८५** |

आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता किरकोळ पुरवठा व्यवसायासाठी एआरआर चा सारांश खालील टेबल मध्ये दाखविण्यात आला आहे:

| अनु. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१८-१९ करीता | | आर्थिक वर्ष २०१९-२० करीता | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | बदलेले प्रक्षेपण | एमवायटी आदेश | बदलेले प्रक्षेपण |
| १ | ऊर्जा खरेदी खर्च (राज्यांतर्गत प्रेषण शुल्कासह) | ४६.८६ | ४१.२४ | ४९.४२ | ४२.६१ |
| २ | प्रचालन आणि देखभाल खर्च | १.१३ | २.१५ | १.१६ | २.३९ |
| ३ | घसारा | ०.१० | ०.०९ | ०.१० | ०.०९ |
| ४ | कर्ज भांडवलावरील व्याज | ०.११ | ०.०८ | ०.१० | ०.०७ |
| ५ | कार्यातील भांडवलावरील व्याज | १.११ | ०.०२ | ०.१० | ०.०४ |
| ६ | ग्राहक सुरक्षा ठेवींवरील व्याज | ०.५९ | ०.३२ | ०.६१ | ०.३५ |
| ७ | बुडीत आणि अनिश्चित कर्जासाठी तरतूद | - | - | - | - |
| ८ | अनिश्चित राखीवसाठीचे योगदान | ०.०१ | ०.०१ | ०.०१ | ०.०१ |
| ९ | राज्यांतर्गत प्रेषण शुल्क | ५.७९ | ५.७९ | ५.८१ | ५.८१ |
| १० | एमएसएलडीसी शुल्क आणि किंमत | ०.०२ | ०.०२ | ०.०२ | ०.०२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | आयकर | ०.०५ | ०.०६ | ०.०५ | ०.०७ |
| १२ | एकूण महसूल खर्च | ५४.७७ | ४९.७९ | ५७.३८ | ५१.४३ |
| १३ | अधिक: समभाग भांडवलावरील गुंतवणूक | ०.१० | ०.०९ | ०.१० | ०.०९ |
| १४ | सरासरी महसूल आवश्यकता | ५४.८६ | ४९.८७ | ५७.४८ | ५१.५२ |
| १५ | वजा: नॉन टरिफ उत्पन्न | ०.०१ | ०.०५ | ०.०१ | ०.०५ |
| १६ | वजा: अन्य व्यास्व्सायामधून उत्पन्न | - | - | - | - |
| १७ | वजा: क्रॉस सबसिडी सरचार्ज वरील प्राप्ती | - | | - | - |
| १८ | वजा: अतिरिक्त अधिभार खात्यामध्ये जमा असल्यास | - | - | -- | - |
| १९ | किरकोळ पुरवठ्यामधून सरासरी महसूल आवश्यकता | ५४.८५ | ४९.८२ | ५७.४७ | ५१.४७ |

वरील कोष्टकामध्ये दाखविल्याप्रमाणे एमबीपीपीएलने माननीय आयोगाकडे आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता डिस्ट्रीब्यूशन वायर्स आणि रिटेल सप्लाय बिझनेसला मान्यता देण्याची विनंती केली आहे.

**५. टॅरिफ फिलोसॉफी आणि टॅरिफ डिझाईन**

५.१ गत महसूल/ फरक (अतिरिक्त)

माननीय आयोगाद्वारे मान्यता मिळाल्यानंतर आर्थिक वर्ष २०१६-१७ पासूनच्या कालावधीसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी चा अतिरिक्त महसूल वाटप करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ मधील प्रत्येकी रु. ३.०२ चा अतिरिक्त महसूल समायोजित करण्यात आल्या नंतर अतिरिक्त महसुलामधील उर्वरित रक्कम आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये समायोजित करण्यात आले आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ करीताच्या तात्पुरत्या समायोजन मधून उद्भवलेले त्याच प्रमाणेमहसुलामधील फरक/ अतिरिक्त हे आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये वसूल करण्यात येण्याचे समजण्यात येईल. माननीय आयोगाद्वारे देण्यात आलेल्या टॅरिफ आदेशाद्वारे स्वीकारण्यात आलेल्या पद्धतीद्वारे  आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता करण्यात येणाऱ्या तात्पुरत्या समायोजन मधून उद्भवलेल्या रकमेचा विचार करण्यात आला आहे.

**५.२ एमवायटी आदेशामध्ये मान्य करण्यात आलेला महसूल फरक / (अतिरिक्त)**

प्रस्तावित एआरआर आणि गत महसूल फरक/ (अतिरिक्त) हिशोबामध्ये धरण्यात आल्या नंतर सध्याचे टॅरिफ खालील टेबल मध्ये दाखविण्यात आल्या प्रमाणे हिशोबामध्ये घेण्यात आले आहे.

**टेबल ५-१: एमव्हायटी आदेशामधील मान्यता देण्यात आलेले टॅरिफ महसूल फरक/ (अतिरिक्त)**

| अनु. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१८-१९ | | आर्थिक वर्ष २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | बदलेले प्रक्षेपण | एमवायटी आदेश | बदलेले प्रक्षेपण |
| १ | वायर्स बिझनेस करीता एआरआर | ११.१२ | १२.४८ | ११.१९ | १२.८५ |
| २ | रिटेल सप्लाय बिझनेस एआरआर | ५४.८५ | ४९.८२ | ५७.४७ | ५१.४७ |
| ३ | वायर्स आणि रिटेल सप्लाय बिझनेस करीता संयुक्त एआरआर | ६५.९७ | ६२.३० | ६८.६६ | ६४.३२ |
| ४ | अधिक: महसुली फरक/(अतिरिक्त) आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या समायोजन साठी | (३.०२) | (०.२४) | (३.०२) | - |
| ५ | अधिक: आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी समायोजनकरीता कॅरींग/(होल्डिंग) किंमत | - | (१.१५) | - | - |
| ६ | अधिक: आर्थिक वर्ष २०१६-१७ करीता महसूल फरक/(अतिरिक्त) | - | (२०.१६) | - | - |
| ७ | अधिक: आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी समायोजनासाठी कॅरींग/(होल्डिंग) किंमत | - | (०.४४) | - | - |
| ८ | अधिक: आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता महसूल फरक/(अतिरिक्त) | - | १.२० | - | ४.५० |
| ९ | वसुलीसाठी निव्वळ एआरआर | ६२.९५ | ५९.५० | ६५.६४ | ६९.११ |
| १० | वजा: मान्य करण्यात आलेले टॅरिफ | ६२.९६ | ५२.५७ | ६५.६३ | ५४.४२ |
| ११ | महसली अंतर/(अतिरिक्त) | (०.०१) | ६.९४ | (०.०१) | १४१.६९ |
| | | | | | |

एमवायटी आदेशामध्ये आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता दरपत्रक मंजूर करण्यात आले असून त्यामध्ये वायर्स आणि रिटेल सप्लाय बिझनेस चा निव्वळ एआरआर मेळ साधत नाही. सरासरी पुरवठा किंमत((एसीओएस)आणि अव्रेज बिलिंग रेट (एबीआर) ह्यामधील फरक खालील टेबल मध्ये दाखविन्यात आले आहे.

टेबल ५-२: आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता प्रस्तावित महसूल आवश्यकता आणि ए सीओएस

| तपशिल | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|
| वसुलीसाठी निव्वळ एआरआर | ५९.५० | ६९.११ |

| | | |
|---|---|---|
| (रु.कोटी) | | |
| ऊर्जा विक्री (एमयू) | ९२.८४ | ९४.७२ |
| पुरवठ्याचा (एसीओएस) (रु./केडब्ल्यूएच) | ६.४१ | ७.३० |
| अव्रेज बिलिंग रेट (एबीआर) | ५.६६ | ५.75 |
| एसीओएस-एबीआर (रु./केडब्ल्यूएच) | ०.75 | १.५५ |

त्यानुसार, प्रस्तावित महसूल आवश्यकतेची जुळवून घेण्याच्या आदेशामध्ये आर्थिक वर्ष २०१९-२० मधील रु. १.५५/केडब्ल्यूएच (आर्थिक वर्ष २०१७-१८ मधील टरिफ प्रीव्हलंट वर) आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ मधील रु. ०.७५/केडब्ल्यूएचद्वारे सरासरी दरपत्रक मधील वाढ प्रस्तावित आहे. त्यानुसार, वसुलीसाठी निव्वळ एआरआर, एसीओएस आणि वाढलेले टॅरिफ खालील टेबल मध्ये दाखीवण्यात आले आहे.

**टेबल ५-३: आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी प्रस्तावित एसीओएस आणि वाढलेले टॅरिफ**

| तपशिल | आर्थिक वर्ष २०१८-१९ (सध्याचे) | आर्थिक वर्ष २०१८-१९ (प्रस्तावित) | आर्थिक वर्ष २०१९-२० (प्रस्तवित) |
|---|---|---|---|
| वसुलीसाठी निव्वळ एआरआर (रु. कोटी) | ५२.५७ | ५९.५० | ६९.११ |
| एसीओएस (रु./केडब्ल्यूएच) | ५.६६ | ६.४१ | ७.३० |
| प्रस्तावित टॅरिफ वाढ | - | १३.२०% | १३.८४% |

**५.३ व्हीलिंग चार्जेसची निश्चिती**

वायर्स बिझनेस आणि प्रस्तावित ऊर्जा विक्री करीता एआरआर वर आधारित एचटी आणि एलटी श्रेणी करीता कॉमन व्हीलिंग चार्जेस प्रस्तावित आहेत जे खालील टेबल मध्ये दाखविण्यात आले आहेत:

**टेबल ५-४: आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता प्रस्तावित व्हीलिंग चार्जेस**

| **तपशिल** | **आर्थिक वर्ष २०१८-१९** | | **आर्थिक वर्ष २०१९-२०** | |
|---|---|---|---|---|
| | **एमवायटी आदेशामध्ये प्रस्तावित** | **प्रस्तावित** | **एमवायटी आदेशामध्ये प्रस्तावित** | **प्रस्तावित** |
| डिस्ट्रीब्यूशन वायर्स बिझनेस कारेता | **१०.६१** | **१२.४८** | **१०.७०** | **१२.८५** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एआरआर (रु. कोटी) | | | | |
| **ऊर्जा विक्री (एमयू)** | **११२.३७** | **९२.८४** | **११७.५१** | **९४.७२** |
| **व्हीलिंग चार्जेस (रु.के/डब्ल्यूएच)** | **०.९४** | **१.३४** | **०.९१** | **१.३६** |

### ५.४ किरकोळ पुरवठा दरासाठी तत्वज्ञान

एमबीपीपीएल ने नियंत्रण कालावधीसाठी किरकोळ पूरवठा दरासाठी (रिटेल सप्लाय टॅरिफ) च्या निश्चितीसाठी खालील टॅरिफ फिलोसोफीचा प्रस्ताव दिला आहे.

**निश्चित/ मागणी शुल्क**

माननीय आयोगाने सध्याचे निश्चित/ मागणी शुल्क पूर्वी प्रमाणेच ठेवले आहेत जे राज्यामधील अन्य वितरण परवान्यानुसार नाहीत. तसेच मान्यताप्राप्त निश्चित/ मागणी शुल्क हे निश्चित शुल्काच्या च्या केवळ १८% आहे जे अतिशय कमी आहे. त्यामुळे सध्याच्या पातळीवरून निश्चित/ मागणी शुल्क मध्ये बदल करणे अतिशय गरजेचे आहे. म्हणून एमबीपीपीएल आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० करीता एमएसईडीसीएल करीता निश्चित/ मागणी शुल्क निश्चित करण्याचा प्रस्ताव आहे. एमबीपीपीएल ने नम्रता पूर्वक माननीय आयोगाला फिक्स्ड/ डिमांड चार्जेस वाढविण्याची विनंती केली आहे.

निश्चित/ मागणी शुल्कामधील प्रस्तावित वाढीमधून महसुलाची निश्चित/ मागणी शुल्क वाढ २६% होईल आणि अनुक्रमे आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये एमबीपीपीएलद्वारे आकारण्यात आलेले निश्चित शुल्क २७% पर्यंत वाढेल.

### ५.५ आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० पासून नियंत्रण काल्वाधीसाठी दरपत्रक प्रस्ताव:

ह्यापूर्वीच्या परिच्छेदांमध्ये देण्यात आलेल्या दरपत्रकाच्या तत्वज्ञानावर आधारित एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी त्यांच्या पुरवठा क्षेत्रासाठी खालील दरपत्रकाचा प्रस्ताव सादर केला आहे.

**टेबल ५-५: डे टॅरीफची सध्याची वेळ**

| कालावधी | ऊर्जा भार (रु. के/डब्ल्यूएच) |
|---|---|
| २२०० वा. ते ०६०० वा. पर्यंत | (१.५०) |
| ०६०० वा. ते ०९०० वा. पर्यंत आणि १२०० वा. ते १८०० वा. पर्यंत | ०.०० |
| ०९०० वा. ते १२०० वा पर्यंत | ०.८० |

| | |
|---|---|
| १८०० वा ते २२०० वा. पर्यंत | १.१० |

**५.५ आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी नियंत्रण कालावधी मध्ये टॅरीफ प्रस्ताव**

अगोदरच्या काही परिच्छेदामध्ये चर्चा करण्यात आलेल्या टॅरिफ फिलोसोफीवर आधारित एमबीपीपीएल ने खालील आर्थिक वर्ष २०१८-९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी टॅरिफ भाडेवाडीचा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.